# आणीबाणीविरोधात केंद्राचा प्रस्ताव

## लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याचा पुनरुच्चार

**नवी दिल्ली/मुंबई–** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत आणीबाणीविरोधात प्रस्ताव सादर करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह उपस्थित मंत्र्यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिले. दरम्यान, अनुशासनाच्या नावाखाली उन्माद आणीबाणीच्या काळात देशाने पाहिला, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आणीबाणीच्या विरोधात मुंबई येथे केली.

नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माहिती दिली की, केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत १९७५ मध्ये लादलेल्या आणीबाणीचा तीव्र निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात आला. २०२५ मध्ये आणीबाणीला ५० वर्षे झाल्यानिमित्त, लोकशाहीचे आणि संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्याचा पुनरुच्चार करत हा ठराव मंजूर करण्यात आला, असे अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. मुंबई येथे संविधान हत्या दिनानिमित्ता आयोजित कार्यक्रमात बोलत असताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अलीकडे कुणीही उठते आणि लोकशाहीची गळचेपी, लोकशाहीची हत्या होत आहे, असे सांगते. पण त्यांनी आणीबाणीच्या कालखंडाकडे बघितले पाहिजे. मग त्यांच्या लक्षात येईल की, आज भारतामध्ये कुठल्याही चौकात उभे राहून देशाच्या पंतप्रधानांना शिव्या देऊ शकता. तरी तुमच्यावर कुणीही कारवाई करत नाही. ही या भारताची लोकशाही आज जिवंत आहे. कारण त्याकाळी आम्ही संघर्ष करून लोकशाही टिकवली.देशात लागू केलेल्या आणीबाणीच्या निर्णयाला ५० वर्ष झाल्यानिमित्त आणीबाणीत संघर्ष करणाऱ्यांच्या स्मरणार्थ मुंबई येथे संविधान हत्या दिन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

### भाजपला नौटंकीचं व्यसन- राऊत

- भाजपाला नौटंकी करण्याचं व्यसन लागलं आहे. ही त्यांची एक नशा आहे. काहीही झालं तरी ते नौटंकी करतात. इंदिरा गांधींनी जी आणीबाणी लावली होती खुलेआम लावली होती. आणीबाणीचा प्रस्ताव घेऊन त्या संसदेत गेल्या होत्या त्यांनी संसदेचं विशेष अधिवेशन घेतलं होतं. गेल्या दहा वर्षांत देशात अघोषित आणीबाणी आहे. लाडक्या उद्योगपतींसाठी संपत्ती लुटली जाते आहे. तेव्हाची आणीबाणी अधिकृत आणि आत्ताची आणीबाणी अघोषित आहे. आता या अघोषित आणीबाणीविरोधात लढलं पाहिजे असं खा.संजय राऊत म्हणाले आहेत.

### भाजपची आणीबाणी छुपी- कडू

- एकही ईडीची कारवाई भाजपच्या माणसावर का झाली नाही? असा सवाल करत ही छुपी आणीबाणीच असल्याचे मत प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांनी व्यक्त केले. ती आणीबीणीची फिजीकली तारीख होती, तुमची छुपी आणीबाणी असल्याचे कडू म्हणाले. भाजपला आणीबाणीवर बोलायचा कोणताही अधिकार नाही. तो त्यांनी गमावला आहे. भाजपची आणीबाणी छुपी आहे, ती निषेधार्ह असल्याचे कडू म्हणाले. तसेच एकही ईडीची कारवाई भाजपच्या माणसावर का झाली नाही? असा सवाल करत कडू यांनी भाजपवर जोरदार टीका केली.

### अघोषित आणीबाणीचे काय?- सपकाळ

- भाजप आणीबाणीवर फक्त कांगावा करत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी आणीबाणीचे समर्थन केले होते. त्यामुळे भाजपला बाळासाहेब देवरसांची भूमिका मान्य नाही का? गेल्या ११ वर्षपासून देशात सुरु असलेल्या अघोषित आणीबाणीचे काय? असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी केला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जून १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागू करण्याचा जो निर्णय घेतला होता तो संविधानिक होता. देशात काही शक्ती अराजक निर्माण करू पहात होत्या. नंतर आणीबाणी उठवून निवडणुका घेतल्या आणि लोकशाही प्रक्रिया पार पाडली. इंदिरा गांधी यांनी आणीबाणीवेळी देशाची संपत्ती विकली नाही. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या उद्योगपतींच्या घशात घातल्या नाहीत, अशी टीका सपकाळ यांनी केली.

# वाढीव मतदानासंदर्भातील याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

## न्यायालयाचे निरीक्षण : वेळ वाया घालवला

**मुंबई–** राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालावर सर्वच विरोधी पक्षांनी शंका उपस्थित करत वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी याबाबत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर २५ जून रोजी निकाल देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार, काल प्रकाश आंबेडकर यांची याचिका फेटाळली आहे. तसेच, न्यायालयाचा वेळ वाया घालवला असं निरीक्षणही नोंदवलं आहे.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अनेकदा महाराष्ट्रातील निकालावर शंका उपस्थित केली होती, तर दोनच दिवसांपूर्वी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागूपरमधील मतदारसंघातील मतांची आकडेवारी शेअर करत प्रश्न उपस्थित केला होता. भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनही काँग्रेसला आकडेवारीसह प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. दुसरीकडे प्रकाश आंबेडकर यांच्यावतीने ७६ लाख मतदारांचा मुद्दा उपस्थित करत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र, प्रकाश आंबेडकर यांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. याचिकाकर्ते आणि आमचा कालच्या कामकाजाचा वेळ वाया घातला, असे निरीक्षणही हायकोर्टाने निर्णय देताना नोंदवले आहे. त्यामुळे, गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या वादावर आता न्यायालयाने आपला निर्णय स्पष्टपणे दिला आहे.

विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ६ वाजल्यानंतर अचानक रहस्यमय पद्धतीने वाढलेल्या ७६ लाख मतांबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. वंचित बहुजन आघाडीचे चेतन चंद्रकांत अहिरे यांनी याबाबत न्यायालयात याचिका दाखल केली होती. यात डॉ.प्रकाश आंबेडकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. पण, मुंबई उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली आहे.

# अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेच्या कामाला गती द्या

## उपमुख्यमंत्री पवार : पुणे-नाशिक हायस्पीडचा आढावा

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील सर्व शासकीय कार्यालये स्वमालकीच्या इमारतींमध्ये स्थलांतरित करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी, यासाठी आवश्यक निधीची तरतूद करून इमारतींच्या बांधकामाला प्राधान्य देण्यात यावे. राज्यात ज्या ठिकाणी विकासकामे सुरु आहेत त्याठिकाणी नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यादृष्टीने कामांचे, वाहतुकीचे नियोजन करून ठरलेल्या वेळेत गतीने कामे पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच मराठवाड्याच्या विकासासाठी महत्त्वाची असणाऱ्या अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामाला गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात, उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक झाली. पुणे शहराच्या विकासाच्यादृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो, पुणे मेट्रो १ व २ मार्गिकेच्या कामाचा आढावा घेत, कोकणाच्या पर्यटनाला चालना देणाऱ्या रेवस ते रेडी किनारा महामार्गाच्या कामाला गती देण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. यावेळी त्यांनी लोणावळा येथील स्कायवॉक आणि टायगर पॉईंट विकास, सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालय, अलिबागच्या उसर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे बाह्यवळण रस्ता, वडाळा येथील जीएसटी भवन, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे, सारथी संस्थेचे छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, खारघर, अमरावतीतील सारथीच्या विभागीय उपकेंद्रांचे बांधकाम, औंध-पुणे येथील नियोजित एम्स हॉस्पिटल, रत्नागिरी येथील मिरकरवाडा बंदर विकास, मुंबई येथील रेडीओ क्लब जेट्टी, नेरळ-शिरुर-कर्जत रस्ता, सातारा सैनिक स्कूल, परळी (जि. बीड) येथील शासकीय पशूवैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथील शासकीय पशूवैद्यकीय महाविद्यालय, पुरंदर विमानतळ, बारामती विमानतळ, बीड विमानतळ, पुणे येथील कृषीभवन, ऑलिम्पिक भवन, कामगार कल्याण भवन, नगररचना भवन, सहकार भवन, नोंदणीभवन, पुणे येथील वीर लहूजी वस्ताद स्मारक, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे वढू आणि तुळापूर येथील स्मारक, फुलेवाडा स्मारक आदी प्रकल्पांच्या प्रगतीचा देखील आढावा घेतला.

# भारतीय अंतराळवीर शुभांशू अंतराळ स्थानकाकडे रवाना

## ४१ वर्षानंतर भारतीय अंतराळात

**वॉशिंग्टन–** भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला २५ जून रोजी ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे रवाना झाले. त्यांच्यासोबत इतर तीन अंतराळवीरही आहेत. शुभांशू या मोहिमेचे पायलट आहेत. भारतीय वेळेनुसार दुपारी १२ वाजता फ्लोरिडा येथील नासाच्या केनेडी स्पेस सेंटरवरून हे मिशन लाँच करण्यात आले. सर्व अंतराळवीरांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटशी जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमध्ये उड्डाण केले. ड्रॅगन अंतराळयान २६ जून रोजी दुपारी ४.३० वाजता आयएसएसशी जोडले जाईल.

अमेरिकन अंतराळ संस्था नासा आणि भारतीय अंतराळ एजन्सी इस्रो यांच्यातील करारानुसार, भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांची या मोहिमेसाठी निवड करण्यात आली आहे. शुभांशू हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले आणि अंतराळात जाणारे दुसरे भारतीय असतील. ४१ वर्षांपूर्वी राकेश शर्मा यांनी १९८४ मध्ये सोव्हिएत युनियनच्या अंतराळयानातून अंतराळात प्रवास केला होता.

ॲक्स-४ मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट अंतराळात संशोधन करणे आणि नवीन तंत्रज्ञानाची चाचणी करणे हे आहे. हे अभियान खाजगी अंतराळ प्रवासाला प्रोत्साहन देणे देखील आहे आणि भविष्यात व्यावसायिक अंतराळ स्थानक बांधण्याची योजना असलेल्या ॲक्सियम स्पेस प्लॅनिंगचा एक भाग आहे.

शुभांशू यांचा जन्म १९८६ मध्ये उत्तर प्रदेशातील लखनौ येथे झाला. त्याने राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) मधून शिक्षण घेतले. ते २००६ मध्ये हवाई दलात सामील झाले आणि लढाऊ विमाने उडवण्याचा अनुभव आहे. त्यांची निवड इस्रोच्या गगनयान मोहिमेसाठीही झाली आहे, जी भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे. शुभांशू १४ दिवस तिथे राहतील आणि ७ प्रयोग करतील, जे भारतीय शैक्षणिक संस्थांनी तयार केले आहेत.

**माझ्या खांद्यावर तिरंगा**

शुभांशू शुक्ला यांनी अंतराळातून पृथ्वीवर पहिला संदेश पाठवला आहे. या संदेशात शुक्ला यांनी म्हटलं आहे की, 'माझ्या प्रिय बांधवांनो, ४१ वर्षांनंतर आपण पुन्हा एकदा अंतराळ प्रवासावर निघालो आहोत. ही राइड भारी आहे. आम्ही सध्या ७.५ किलोमीटर प्रति सेकंद या वेगाने पृथ्वीला प्रदक्षिणा घालत आहोत. माझ्याबरोबर, माझ्या खांद्यावर आपला तिरंगा आहे. हा तिरंगा मला सांगतोय की मी या प्रवासात एकटा नाहीये. मी तुम्हा सर्वांबरोबर इथे आहे.'

# माऊलींच्या पालखीचा आज नीरा स्नान सोहळा



**पुणे (प्रतिनिधी)–** संत ज्ञानेश्वर माउलींचा सोहळा वाल्हे मुक्कामी, तर संत तुकोबारायांचा पालखी सोहळा उंडवडी गवळ्यांची येथे बुधवारी विसावला. माउलींच्या पालखीचा गुरुवारी नीरा स्नान सोहळा असून, त्यानंतर पालखी लोणंदमध्ये मुक्काम करणार आहे. तर तुकोबांची पालखी बारामतीच्या दिशेने निघेल.

खंडेरायाचे दर्शन घेऊन व जेजुरीकरांना निरोप देऊन माउलींचा पालखी सोहळा सकाळी पंढरीच्या वाटेला लागला. अभंगाच्या तालावर नृत्य, फुगड्या रंगल्या. येथील विसावा हा मनाला प्रसन्नता देतो. वारकरी व भाविकांनी दौंडज खिंडीत हीच अनुभूती घेतली. सोहळा महर्षी वाल्मिकींच्या वाल्हे मुक्कामी पोहोचला, तेथे पालखीचे थाटात स्वागत करण्यात आले. जेजुरी ते वाल्हे हा १२ किमीचा टप्पा आहे. हा टप्पा ओलांडल्यानंतर पालखी सातारा जिल्ह्यात प्रवेश करते. गुरुवारी माउलींच्या पालखीचा नीरा स्नान सोहळा आहे. त्यामुळे वारकऱ्यांचे डोळे आता नीरा स्नानाकडे लागले आहेत. विठुनामाच्या गजरात माउलींच्या पादुकांना नीरा स्नान घालण्यात येईल. त्यानंतर लोणंदमध्ये विसावेल.

# गर्भलिंग चाचणी रोखण्यासाठी जिल्ह्यात अचानक छापे

## जिल्हाधिकाऱ्यांचा कडक इशारा; विशेष पथकांव्दारे कारवाईचे निर्देश

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात मुलींच्या घटत्या जन्मदराच्या पार्श्वभूमीवर गर्भलिंग चाचणी रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत. याअंतर्गत सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांवर अचानक छापे टाकण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या आहेत. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत लिंग गुणोत्तर, साथरोग परिस्थिती, जन्म-मृत्यू नोंदणी व क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे आदी उपस्थित होते. गर्भलिंग चाचणीविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी सर्व सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांची अचानक तपासणी करण्यासाठी विशेष पथकांची नियुक्ती करणे, संशयास्पद गर्भपातप्रकरणी सखोल चौकशी करणे, गरोदर मातांचा नियमित पाठपुरावा, लिंगनिदानविषयी जनजागृती मोहिमा राबविणे, गर्भपातासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांच्या विक्रीवर अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत नियमित देखरेख ठेवणे अशा उपाययोजना तात्काळ राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिले.

पावसाळा सुरू झाल्याने सध्या जिल्ह्यात डेंग्यूसह विविध साथींचा धोका लक्षात घेता खासगी डॉक्टरांनी डेंग्यू निदान झालेल्या रूग्णांची माहिती शासकीय यंत्रणेला वेळेत देणे बंधनकारक करण्यात आले आहे. माहिती लपवणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांवर कायदेशीर कारवाई होणार असल्याचा इशाराही डॉ. आशिया यांनी दिला. सर्व खासगी डॉक्टरांनी क्षयरोग रूग्णांची माहिती सरकारी यंत्रणेला देणे अनिवार्य आहे. उपचार प्रक्रियेत सरकारी मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, लिंग गुणोत्तर सुधारणा, साथरोग नियंत्रण व अचूक नोंदणी या बाबतीत शासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी एकत्र येऊन काम केल्यासच योग्य परिणाम मिळू शकतो, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. आशिया व सीईओ भंडारी यांनी केले.

**जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रियेवर भर**

जन्म-मृत्यू नोंदणी बाबत जिल्हाधिकारी डॉ. आशिया व सीईओ भंडारी यांनी सविस्तर आढावा घेऊन सूचना केल्या. जन्म- मृत्यूची घटना ज्या कार्यक्षेत्रात होईल त्याच कार्यक्षेत्रात सदर घटनांची जन्म- मृत्यू नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. ज्या रूग्णालयामध्ये जन्म- मृत्यू होईल त्या रूग्णालयांनी सदर घटनांची नोंद करून अहवाल सादर करावा. तसे न केल्यास त्यांच्या विरूध्द कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

# ट्रक टर्मिनलच्या कामाची आमदार खताळांनी केली पाहणी

**संगमनेर (प्रतिनिधी)–** येथील नगरपालिकेच्यावतीने पंचायत समिती जवळील गुंजाळनगर परिसरात ट्रक टर्मिनल उभारण्यात येत आहे. या टर्मिनलच्या कामाची आमदार अमोल खताळ यांनी पाहणी केली.



याप्रसंगी पालिकेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे, कार्यालय अधीक्षक राजेश गुंजाळ, शिवसेना शहराध्यक्ष दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, तालुकाध्यक्ष रामभाऊ रहाणे, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे, ज्ञानेश्वर कर्पे, जावेद जहागिरदार, शौकत जहागिरदार, रोहित चौधरी, सौरभ देशमुख, आरपीआयचे शहराध्यक्ष कैलास कासार आदी उपस्थित होते. या ट्रक टर्मिनलचे काम ठेकेदाराने चांगल्या दर्जाचे करावे आणि चार ते पाच महिन्यात पूर्ण करावे. तसेच ट्रकचालक व क्लिनर यांना चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशा सूचना यावेळी आमदार अमोल खताळ यांनी पालिका प्रशासनाला दिल्या. तसेच शहरातील नवीन नगर रोडचे काम पुढील आठवड्यामध्ये सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शिवम गुंजाळ, लालू गुंजाळ, सचिन शहाणे, हेमंत गाडेकर, निखील धुमसे, विलास घुले, अवधूत साबळे, निखील गाडेकर, सौरव गुंजाळ, आदित्य नवले, यश गुंजाळ, अनिल गुंजाळ, प्रदीप राजपूत, प्रवीण गुंजाळ आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

## चाकूने भोसकून विद्यार्थ्याची हत्या

झाला. त्याचा परिणाम अत्यंत भीषण ठरला. वादानंतर मुस्तकीन हा शाळेच्या ऑफिसजवळ उभा असताना संशयित आरोपी आठवीतील मुलाने त्याच्यावर अचानक हल्ला केला. त्याने मुस्तकीनच्या मानेवर वार केला आणि नंतर चाकू पोटात खुपसला. या भीषण हल्ल्यामुळे शाळेत भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळी उपस्थित शिक्षकांनी तात्काळ हस्तक्षेप करत मुस्तकीनला जिल्हा रूग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि संशयित आरोपी अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. या प्रकरणी मृत मुस्तकीनचे वडील तन्वीर शेख यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपीला गुरूवारी बाल न्याय मंडळासमोर हजर केले जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

**शाळा प्रशासन व पालकांमध्ये संताप**

शाळेतील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. विद्यार्थ्याच्या हातात चाकू कसा काय आला, आणि शाळेत तो कसा नेला गेला, यासंदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या घटनेनंतर शाळा प्रशासनासमोर जबाबदारीची भावना आणि सुरक्षा यंत्रणेचा पुन्हा आढावा घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

## सीबीएसई दहावी बोर्डाची वर्षातून...

विद्यार्थ्यांना एकाच शैक्षणिक वर्षात दोन वेळा परीक्षेला बसता येणार आहे. या निर्णयामागचा उद्देश हा विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा तणाव कमी व्हावा आणि विद्यार्थ्यांना त्यांची कामगिरी सुधारण्यासाठी संधी मिळावी, हा उद्देश असल्याचं सांगितलं जात आहे. सीबीएसईच्या नव्या निर्णयानुसार आता प्रत्येक विद्यार्थ्याने फेब्रुवारीत होणारी परीक्षा देणं अनिवार्य आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना त्यांचे गुण आणखी सुधारायचे असतील त्या विद्यार्थ्यांनी मे महिन्यांत होणाऱ्या दुसरी परीक्षा देणं गरजेचं असणार आहे. पण एका वर्षात दोन परीक्षा घेण्यात येणार असल्या तरी विद्यार्थ्यांचं वर्षातून एकदाच मूल्यांकन होणार आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

तसेच सीबीएसईने घेतलेल्या या निर्णयाची आता लगेच अंमलबजावणी होणार नाही, तर हा निर्णय २०२६ पासून लागू केला जाणार आहे. पण या निर्णयाबाबतही सीबीएसई आणखी काही नियम तयार करणार असून त्या नियमांवर पुन्हा विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांकडून सूचना मागवल्या जातील. त्यानंतर त्या सूचना लक्षात घेऊन पुढील अंमलबजावणी कशी करायची? याचा निर्णय घेतला जाणार आहे.

**निकाल कधी?**

पहिल्या टप्प्यातील निकाल एप्रिलमध्ये जाहीर केले जातील, तर दुसऱ्या टप्प्याचे निकाल जूनमध्ये जाहीर केले जातील. या निर्णामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे गुण सुधारण्याची संधी मिळेल. तसेच या शैक्षणिक वर्षात अंतर्गत मूल्यांकन फक्त एकदा होईल जे दोन्ही परीक्षा टप्प्यांसाठी लागू असेल.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत

# ब्राम्हणी येथे विविध दाखल्यांचे वाटप

**उंबरे (वार्ताहर)–** महसूल प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

या निर्णयानुसार प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर वर्षातून किमान चार वेळा 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' आयोजित करण्यात येणार आहे. त्यानुसार ब्राम्हणी येथे ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले, रेशन कार्ड यांचे वाटप, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना आदी सामाजिक लाभाच्या योजना आदींचा लाभ देण्यात आला. तसेच या अभियानांतर्गत सात-बारा वाटप, प्रलंबित फेरफार नोंदी निर्गत करणे व विविध शासकीय योजनासाठी लागणारे दाखले अशा महसूल विभागाच्या विविध योजना आदींबाबत सुद्धा आवश्यक ते कामकाज करण्यात आले.



जिल्हाधिकारी पंकज आशिया, प्रातांधिकारी किरण सावंत, तहसिलदार नामदेव पाटील यांनी तालुक्यातील अनेक ठिकाणी भेटी देऊन आढाव घेतला. ब्राम्हणी येथील शिबिर प्रसंगी सरपंच सुवर्णाताई बानकर, उपसरपंच भानुदास मोकाटे, भाजपाचे तालुकाध्यक्ष सुरेशराव बानकर, बाजार समितीचे माजी संचालक रंगनाथ मोकाटे, माणिक तारडे, महेंद्र तांबे, बाळासाहेब देशमुख, उमाकांत हापसे, बाबासाहेब गायकवाड, काशिनाथ हापसे, मंडळाधिकारी विश्वास आढाव, तलाठी जालिंदर पाखरे, राहूल कऱ्हाड, बाबासाहेब कराळे, प्राजक्त रामफळे, प्रविण जाधव, श्री. लोखंडे, कृषि सहाय्यक मंगेश बनकर, गणेश हापसे, शुभम कदम, प्रसाद बानकर, महेश हापसे, नरेंद्र म्हसे, योगेश बानकर, अमृत तरवडे, राजू नानेकर, समिर शेख आदी उपस्थित होते.